बन्सीलाल रामनाथ अगरवाल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित
विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त संस्था)
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
६६६, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे - ४११ ०३७.
Approved by A. I. C. T. E. New Delhi

Bansilal Ramnath Agarwal Charitable Trust's
Vishwakarma Institute of Technology
An Autonomous Institute Affiliated to Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
666, Upper Indiranagar, Bibwewadi, Pune - 411 037.
Identification No. - PU/PN/Engg./061/(1984)

नोटीस नं. २७४ **नोटीस** दि :७/०३/२०२५

**OBC/SBC/VJ/DT/NT/SEBC या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्राचे आधारे महाडीबीटी पोर्टलवरील योजनेचा लाभ देणेबाबत.**
**(ऑनलाईन अर्ज करणेची अंतिम तारीख दि. ३१/०३/२०२५)**

महाविद्यालयातील मागास प्रवर्गातील व शिष्यवृत्ती /फ्रिशीप/ईबीस सवलतीसाठी पात्र ठरत असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून OBC/SBC/VJ/DT/NT/SEBC या प्रवर्गासाठी शासनाने उत्पन्न मर्यादेची अट काढून टाकलेली असून त्याऐवजी विद्यार्थ्यांना नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राच्या आधारे व इतर अटी शर्तीच्या आधारे शासनाच्या OBC/SBC/VJ/DT/NT/SEBC योजनांव्दारे लाभ देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

तरी महाविद्यालयामध्ये मागास प्रवर्गातून म्हणजेच OBC/SBC/VJ/DT/NT/SEBC अशा विद्यार्थ्यांचे पालकांचे सर्व मार्गाने मिळून वार्षिक उत्पन्न रूपये ८,००,०००/- लाखापेक्षा जास्त आहे परंतू नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र त्यांना मिळालेले आहे तसेच ज्या विद्यार्थ्यांचा प्रवेश केंद्रिय प्रवेश प्रक्रियेव्दारा झालेला आहे अशाच (सदर योजना संस्थास्तरावर प्रवेशित व मॅनेजमेंट कोटा यांना लागू नाही) सर्व विद्यार्थ्यांनी शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवरून दि. ३१ मार्च २०२५ पूर्वी त्यांस लागू असलेल्या योजनेकरिता ऑनलाईन अर्ज भरून महाविद्यालयात जमा करावा.

नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र नसल्यास त्यांचे अथवा त्याचे पालकांनी दि. ३१/०३/२०२५ पूर्वी नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र व उत्पन्न दाखला (जरी रू. आठ लाख किंवा त्यापेक्षा जास्त असेल) तरी काढून त्यास लागू होत असलेल्या योजनांचा लाभा घ्यावा. तसेच नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची वैधता ही दि. ३१/०३/२०२५ पर्यंत असणे अनिवार्य आहे, याची OBC/SBC/VJ/DT/NT/SEBC या प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची वैधता ही दि. ३१/०३/२०२५ नसल्यास लाभ मिळणार नाहीत याची देखील सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत महाडीबीटी पोर्टलवरून अर्ज न भरल्यास अथवा कागदपत्रांअभावी अर्ज न भरल्यास त्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही याची देखील सर्व विद्यार्थी व पालकांनी नोंद घ्यावी.

B.R.A.C. TRUST विश्वकर्मा इन्स्टिट्युट पुणे-३७. Vishwakarma Institute of Technology

संचालक
विश्वकर्मा इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी,
पुणे ३७

प्रत:- १) सर्व विभाग प्रमुख यांना माहितीसाठी व विभागातील नोटीस बोर्डसाठी, २) महाविद्यालयातील सर्व नोटीस बोर्डकरिता- विद्यार्थ्यांच्या माहितीस्तव ३) सिस्टीम विभाग प्रमुख यांना महाविद्यालयाच्या संकेतस्थळावा अपलोड करणेकरिता.